RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक १३(२)] बुधवार, जुलै ३१, २०२४/श्रावण ९, शके १९४६ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ३४

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.—** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. **पृष्ठे** १-२

दिनांक २९ जुलै २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

२०१५ चा महा. २८. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ७ मधील, पोट-कलम (३) मध्ये,— २०१५ चा महा. २८.

( एक ) खंड (क) मधील, " मुख्य सचिव " या मजकुरानंतर, " किंवा अपर मुख्य सचिव " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

( दोन ) खंड (ज) मधील, " सचिव " या मजकुराऐवजी, " सदस्य-सचिव " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मध्ये, पोट-कलम (१) मधील, " त्यांच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका " या मजकुरानंतर, " किंवा ते वयाची पासष्ट वर्षे पूर्ण करेपर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ११ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये, पोट-कलम (३) मधील, खंड (क) मधील, " मुख्य सचिव " या मजकुरानंतर, " किंवा अपर मुख्य सचिव " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.